MHJN080002112026

निशाणी क्र.०५ खालील आदेश

(दिनांक २४/०३/२०२६)

प्रस्तुत अर्ज वादीने न्यायालयीन आयुक्त नेमणुक होणेकरीता केलेला आहे.

२) वादीने असे कथन केले की, मुळ दावा अतिक्रमणीत क्षेत्राचा वादीस प्रतिवादी कडून ताबा मिळणे बाबत दाखल केले आहे. प्रतिवादीने वादीच्या जमीनीवर अतिक्रमण केल्यानंतर वादीने भुमिअभिलेख कार्यालय, घनसावंगी यांना अर्ज केला होता. परंतु सदर कार्यालयाने मोजणी न करता वादीस तोंडी न्यायालयात जाण्याचे सांगितले. त्यानंतर वादीने वादग्रस्त गटाची खाजगीरीत्या मोजणी केली असता प्रतिवादीने पुर्व बाजुने २० आर जमीनीवर अतिक्रमण केल्याचे आढळुन आले आहे. वादीच्या मालकी व ताब्यातील क्षेत्रावर प्रतिवादीने केलेले अतिक्रमण निश्चीत करण्यासाठी भुमिअभिलेख कार्यालय, घनसावंगी यांची न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणुक करुन त्यांच्या मार्फत गट क्र.१६३ व लगतचे गट मोजुन वादीच्या जमीनीवर अतिक्रमण निश्चीत करण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

३) प्रतिवादी यांनी अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करून आक्षेप घेतला की, त्यांनी वादीच्या जमीनीवर अतिक्रमण केलेले नाही. वादींनी केवळ प्रतिवादी यांना त्रास देण्याच्या उद्देशाने खोटा दावा व अर्ज दाखल केलेला आहे. सबब वादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४) अभिलेखाचे अवलोकन केले व दोन्ही बाजुंचा युक्तिवाद केला.

५) या आदेशाचे योग्य ते न्यायनिर्णयासाठी मी खालील मुद्दे निर्धारीत करुन त्यावर माझा निष्कर्ष खालील दिलेल्या कारणास्तव नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक वादविषयाबाबत योग्य न्यायदान करण्यासाठी आवश्यकता आहे का ? | होय. |
| २) | आदेश काय ? | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

६) अर्जाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा अतिक्रमणीत जमीनीचा ताबा मिळण्याबाबत दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी आक्षेप घेतला की, त्यांनी वादीच्या जमीनीवर कुठल्याही प्रकारे अतिक्रमण केलेले नाही. सदर दाव्यामध्ये वादीचा तोंडी पुरावा घेऊन दाव्यातील मुळ वादप्रश्न सुटणार नाही. त्याकरिता त्या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तीचा अहवाल अभिलेखावर असणे आवश्यक आहे, जेणे करून मुळ वादप्रश्न सोडविण्यास न्यायालयास मदत होईल. त्याकरिता मी या निष्कर्षास पोहोचते की, सदर दाव्यामध्ये मोजणी तज्ञाकडून होणे गरजेचे आहे.

७) मा. उच्च न्यायालयाने या पुढील न्यायनिर्णयामध्ये ***Shri Bhupendra s/o Bhagwat Turkar Vs. Shri Homeraj s/o Zituji Meshram reported in 2014(3) All MR 365,*** 'The Hon'ble our High Court held that, *in the cases of boundary dispute and identity of the land, measurement thereof and area of the land is needed to be considered preferably on the basis of authentic evidence and map of the land drawn by competent public official. It is further held that, it is always desirable to*

*get the suit land or field measured by an expert or competent public official to find out the area of the suit land encroached upon more so, when oral evidence can not help the Court.* In view of above ratio, in this case also, there is requirement to get measure the suit land', असे निर्णय आलेले आहे. वरील न्यायनिर्णयाच्या आधारे या प्रकरणामध्ये या मताला आले आहे की, या प्रकरणात अतिक्रमणाचा वाद असल्याचे न्यायालयीन आयुक्त नेमल्यावर सदरचे प्रकरणात निर्णय करणे सोयीचे होईल. वादी यांच्या म्हणण्यानुसार न्यायालयीन आयुक्त नेमणुक केल्यास कोणाचेही नुकसान होणार नाही.

८) सदर बाब लक्षात घेता, न्यायालयीन आयुक्ताची नियुक्ती केल्यास निश्चितच दाव्याच्या परिणामकारक निकालासाठी व उभयपक्षातील वादाचे संपूर्ण निराकरण करण्यासाठी मदत होईल. तसेच, सदर न्यायालयीन आयुक्तची मागणी ही पुरावा गोळा करण्यासाठी केलेली दिसुन येत नाही. करीता, सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणून खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. उप अधिक्षक भुमिअभिलेख कार्यालय, घनसावंगी, ता. घनसावंगी, जि. जालना यांना सदर प्रकरणात न्यायालयीन आयुक्त म्हणुन नियुक्त करण्यात येत आहे.

२. न्यायालयीन आयुक्ताने मौजे साकळगाव, ता.घनसावंगी, जि.जालना येथील गट क्र.१६३ ची, सह खातेदाराची व आवश्यकता भासल्यास लगतच्या शेतजमीनींची मोजणी भुमापन संहिते अन्वये करावी व मोजणी नकाशा तयार करुन सविस्तर मोजणी अहवाल नकाशासह न्यायालयात दिनांक ०२/०७/२०२६ पावेतो सादर करावा.

३. मोजणीसाठी आवश्यक दस्तऐवज पुर्तता उभयपक्षांनी तात्काळ करावी.

४. न्यायालयीन आयुक्ताचा आवश्यक तो खर्च वादीने सोसावा व तो खर्च भूमी अभिलेख कार्यालय, घनसावंगी येथे भरावा.

५. न्यायालयीन आयुक्त नियुक्तीची पत्र देण्यात यावे.

स्वाक्षरीत/-

दिनांक २४/०३/२०२६

(श्रीमती एल. एन. पांचाळ)
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
घनसावंगी.